# रोजगार हमी योजना समिती
# सर्वसाधारण माहिती

**समितीची रचना :-**

रोजगार हमी योजनेखाली श्रमिकांना शासनाने उपलब्ध केलेल्या सोयी सवलतीचा कितपत लाभ होतो, योजनेचा श्रमिकावर काय परिणाम होतो व योजनेचे उद्दिष्ट साधण्याच्या दृष्टिने काय करणे आवश्यक आहे यासंबंधी शासनास सूचना करण्याच्या हेतूने विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची रोजगार हमी योजना समिती दिनांक १३ ऑगस्ट, १९७५ रोजी गठीत करण्यात आली. मा.अध्यक्ष आणि मा.सभापती हे या समितीवरील सदस्यांना नामनियुक्ती करतात व त्यानुसार या समितीवरील विधानसभेचे २० आणि विधानपरिषेदेचे ५ सदस्य असतात. (म.वि.स. नियम २४१)

**समितीची कामे :-**

रोजगार हमी योजनेअंतर्गत कामावर असलेल्या मजूरांना मिळालेले फायदे व त्यांच्यावर या योजनेचा झालेला परिणाम यांच्या संदर्भात उक्त योजनेच्या कामकाजाचे विशेषकरुन परीक्षण करणे, तत्संबंधात अंदाज घेणे आणि मूल्यमापन करणे, तसेच त्याबाबतीत कोणत्याही त्रुटी वा उणिवा असल्यास, त्या शोधून काढणे व त्या दूर करण्यासाठी आणि उक्त योजनेत सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचवणे तसेच योजनेचे काम अधिक चांगल्या प्रकारे चालविण्यास हितावह ठरतील अशा सर्वसाधारण शिफारशी करणे व त्या शिफारशीनुसार सुचविलेल्या योजनेच्या उद्दिष्टांची चांगल्या निर्कषामध्ये परिणिती करणे ही या समितीची कामे आहे. (म.वि.स.नियम २४२)

**समितीच्या कामकाजाचे स्वरुप साधारणपणे खालीलप्रमाणे असते :-**

**(१)** राज्याच्या महसूल विभागीय ठिकाणी बैठकी घेऊन विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व ही योजना राबविणाऱ्या कार्यान्वयीन यंत्रणेतील प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत रोजगार हमी योजनेच्या धोरणात्मक बाबी आणि ही योजना राबविताना त्यांना येणाऱ्या अडचणी यासंबंधात त्याच्याशी चर्चा करणे, यासाठी विभागीय बैठकीची प्रश्नावली तयार करुन नियोजन (रोहयो) विभागामार्फत सर्व विभागीय आयुक्त यांना पाठविली जाते व त्यासंदर्भात विभागीय आयुक्तांकडून प्राप्त होणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने समिती विभागीय बैठकीच्या वेळी चर्चा करते.

**(२)** विभागीय बैठकीचा कार्यक्रम संपल्यानंतर समिती जिल्ह्यांना भेट देत असते. हा जिल्हा बैठकीचा कार्यक्रम दोन दिवसांचा असतो. जिल्ह्यातील तालुक्याच्या ठिकाणी सुरू असलेल्या कामाच्या ठिकाणी जाऊन समिती कामावरील मजूरांसमवेत चर्चा करते व मजूरांना मिळणाऱ्या सोयी सवलती व मजुरी संदर्भात त्यांच्या अडीअडचणी जाणून घेते. दुसऱ्या दिवशी समितीची बैठक जिल्ह्याच्या ठिकाणी होत असते. या बैठकीत जिल्हाधिकारी व जिल्ह्यातील कार्यान्वयीन यंत्रणेचे अधिकारी यांचे समवेत समिती सदस्यांना कामावरील भेटीच्या वेळी आढळून आलेल्या त्रुटी तसेच जिल्हा बैठकीच्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेली माहिती यासंदर्भात चर्चा केली जाते.

**(३)** विभागीय व जिल्हा बैठकीनंतर सदर बैठकीत आढळून आलेल्या त्रुटी व महत्त्वाच्या मुद्यांबाबत प्रश्नावली तयार करुन मंत्रालयीन विभागाच्या संबंधित सचिवांची साक्ष घेण्यात येते व त्या अनुषंगाने योजनेत सुधारणा होण्याच्या दृष्टीने अहवाल तयार करुन तो समितीसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात येतो. समितीने मान्यता दिल्यानंतर सदर अहवाल मुद्रित करुन सभागृहास सादर करण्यात येतो.

समितीच्या वरील कामाव्यतिरिक्त मागील समितीने सभागृहास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाही संबंधात मंत्रालयीन विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीवर समिती विचार करते. आवश्यकता वाटल्यास मंत्रालयीन विभागाच्या सचिवांची पुन्हा साक्ष घेण्यात येते. व तद्नंतर त्यासंबंधीचा अनुपालन अहवाल तयार करुन समितीने मान्यता दिल्यानंतर सभागृहास सादर करण्यात येतो.

**रोजगार हमी योजना समितीच्या स्थापनेपासून (ऑगस्ट, १९७५ पासून) चौदाव्या विधानसभेपर्यन्त समितीने विधानमंडळ सभागृहास खालीलप्रमाणे अहवाल सादर केले आहेत.**

| **अ.क्र** | | **समिती प्रमुखांचे नांव** | **वर्षे** | **अहवाल** | **अहवाल सभागृहास सादर करण्यात आल्याचा दिनांक** |
|---|---|---|---|---|---|
| **(१)** | | **(२)** | **(३)** | **(४)** | **(५)** |
| **१) चौथी विधानसभा (सहा अहवाल)** | | | | | |
| १) | पहिली समिती | श्री. प्र.कृ.सावंत | ऑगस्ट, १९७५ ते जुलै, १९७६ | पहिला अहवाल<br>दुसरा अहवाल<br>तिसरा अहवाल<br>चौथा अहवाल | १० डिसेबर, १९७५<br>१९ जुलै,१९७६<br>२७ जुलै, १९७६<br>२७ जुलै, १९७६ |
| २) | दुसरी समिती | श्री.प्र. कृ. सावंत | १९७६ -७७ | --------- | काही नाही<br>------- |
| ३) | तिसरी समिती | श्रीमती केशरबाई क्षीरसागर | १९७७ - ७८ | पाचवा अहवाल<br>सहावा अहवाल | ४ नोव्हेंबर,१९७७<br>४ नोव्हेंबर, १९७७ |
| **२) पाचवी विधानसभा (दोन अहवाल)** | | | | | |
| ४) | चौथी समिती | श्री. नानाभाऊ पाटील - एंबडवार | १९७८ - ७९ | पहिला अहवाल<br>दुसरा अहवाल | १६ जून,१९७८<br>४ एप्रिल,१९७९ |
| ५) | पाचवी समिती | श्री. राजाराम शिंदे | १९७९ -८० | ---------- | ------- |
| **३) सहावी विधानसभा (दहा अहवाल)** | | | | | |
| ६) | सहावी समिती | श्री. भाऊ साबळे | १९८० - ८१ | पहिला अहवाल<br>दुसरा अहवाल | १७ एप्रिल,१९८१<br>१७ एप्रिल,१९८१ |
| ७) | सातवी समिती | श्री. शंकरराव बोकडे | १९८१ -८२ | तिसरा अहवाल<br>चौथा अहवाल | ९ सप्टेंबर,१९८१<br>२२ एप्रिल,१९८२ |
| ८) | आठवी समिती | श्री. चंदनसिंह सदीवाल | १९८२ -८३ | पाचवा अहवाल<br>सहावा अहवाल<br>सातवा अहवाल | २२ सप्टेंबर,१९८२<br>११ एप्रिल,१९८३<br>१२ एप्रिल,१९८३ |
| ९) | नववी समिती | श्री. सूर्यकांत पलांडे | १९८३ - ८४ | आठवा अहवाल<br>नववा अहवाल | १३ डसेंबर,१९८४<br>२४ एप्रिल,१९८४ |
| १०) | दहावी समिती | श्री.बाळासाहेब जाधव | १९८४ - ८५ | दहावा अहवाल | मा. अध्यक्षांचे निदेश क्र. ९ व मा. सभापती यांचे निदेश क्र. ९ अनुसार मा. अध्यक्ष व मा. सभापती यांना अनुक्रमे १४ फेब्रुवारी १९८५ व दिनांक ४ मार्च, ८५ रोजी सादर करण्यात आला. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **४) सातवी विधानसभा (सात अहवाल)** | | | | | |
| ११) | अकरावी समिती | श्री.बाळासाहेब जाधव | १९८५ - ८६ | पहिला अहवाल | ३१ जुलै, १९८५ |
| १२) | बारावी समिती | श्री. साहेबराव देशमुख बारडकर | १९८६ - ८७ | दुसरा अहवाल<br>तिसरा अहवाल | ०९ एप्रिल,१९८७<br>२१ एप्रिल,१९८७ |
| १३) | तेरावी समिती | श्री. साहेबराव देशमुख बारडकर | १९८७ - ८८ | चौथा अहवाल | २१ एप्रिल,१९८८ |
| १४) | चौदावी समिती | श्री. आनंदराव नारायणराव | १९८८-८९ | पाचवा अहवाल<br>सहावा अहवाल | ०४ एप्रिल,१९८९<br>२८ एप्रिल,१९८९ |
| १५) | पंधरावी समिती | श्री. सुनिल शिंदे | १९८९-९० | सातवा अहवाल | २० ऑक्टोबर, १९८९ |
| **५) आठवी विधानसभा (सात अहवाल)** | | | | | |
| १६) | सोळावी समिती | श्री. यादवराव भोयर | १९९१ -९२ | पहिला अहवाल | ३१ जुलै, १९९१ |
| १७) | सतरावी समिती | श्री. बाळासाहेब जाधव | १९९२ - ९३ | दुसरा अहवाल<br>तिसरा अहवा<br>चौथा अहवाल<br>पाचवा अहवाल | १४ जुलै, १९९२<br>१४ जुलै, १९९२<br>१६ एप्रिल, १९९३<br>१६ एप्रिल,१९९३ |
| १८) | अठरावी समिती | श्री. साहेबराम देशमुख बारडकर | १९९४ -९५ | सहावा अहवाल<br>सातवा अहवाल | ३० जुलै, १९९४<br>३० नोव्हेंबर,१९९४ |
| **६) नववी विधानसभा (सहा अहवाल)** | | | | | |
| १९) | एकोणीसावी समिती | श्री. सूर्यकांत दळवी | १९९५ -९६ | पहिला अहवाल<br>दुसरा अहवाल | २२ मार्च, १९९६<br>६ ऑगस्ट,१९९६ |
| २०) | विसावी समिती | श्री. सूर्यकांत दळवी | १९९६ - ९७ | काही नाही | |
| २१) | एकविसावी समिती | श्री. शिवाजीराव कुंडलिकराव चोथे | १९९७ -९८ | तिसरा अहवाल<br>चौथा अहवाल | २३ डिसेंबर, १९९७<br>२३ एप्रिल, १९९८ |
| २२) | बाविसावी समिती | श्री. शिवाजीराव कुंडलिकराव चोथे | १९९८ -९९ | पाचवा अहवाल<br>सहावा अहवाल | २४ डिसेंबर, १९९९<br>२३ एप्रिल, १९९९ |
| **७) दहावी विधानसभा (दहा अहवाल)** | | | | | |
| २३) | तेविसावी समिती | श्री. कृष्णराव इंगळे | २००० -२००१ | पहिला अहवाल<br>दुसरा अहवाल<br>तिसरा अहवाल | २७ जुलै, २०००<br>५ डिसेंबर,२०००<br>१८ एप्रिल,२००१ |
| २४) | चोविसावी समिती | श्री. कृष्णराव इंगळे | २००१ -२००२ | चौथा अहवाल<br>पाचवा अहवाल<br>सहावा अहवाल | २ ऑगस्ट,२००१<br>११ डिसेंबर,२००१<br>२४ एप्रिल,२००२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २५) | पंचविसावी समिती | श्री. कृष्णराव इंगळे | २००२ - २००३ | सातवा अहवाल<br>आठवा अहवाल<br>नववा अहवाल | १३ डिसेंबर,२००२<br>२४ डिसेंबर,२००२<br>२२ जुलै,२००३ |
| २६) | सव्विसावी समिती | श्री. दिनकरराव पाटील | २००३ -२००४ | दहावा अहवाल | १७ मार्च, २००४ |
| **८) अकरावी विधानसभा (वीस अहवाल)** | | | | | |
| २७) | सत्ताविसावी समिती | श्री. संजय देवतळे | २००५ - २००६ | पहिला अहवाल (अहमदनगर, नंदुरबार, बुलढाणा व गडचिरोली जिल्हा)<br>दुसरा अहवाल (औरंगाबाद जिल्हा)<br>तिसरा अहवाल (वाशिम , सांगली व पुणे जिल्हा)<br>चौथा अहवाल (सातारा जिल्हा)<br>पाचवा अहवाल (ठाणे, सोलापूर व नांदेड जिल्हा)<br>सहावा अहवाल (बीड व नांदेड जिल्हा अनुपालन अहवाल)<br>सातवा अहवाल (पुणे जिल्हा - अनुपालन अहवाल)<br>आठवा अहवाल ( सातारा जिल्हा अनुपालन अहवाल)<br>नववा अहवाल (धुळे जिल्हा अनुपालन अहवाल)<br>दहावा अहवाल (औरंगाबाद जिल्हा अनुपालन अहवाल)<br>अकरावा अहवाल (अमरावती जिल्हा अनुपालन अहवाल)<br>बारावा अहवाल (धुळे जिल्हा ) | २१ जुलै, २००५<br>१४ डसेंबर,२००५<br>१३ एप्रिल,२००६<br>१८ एप्रिल, २००६<br>१८ जुलै, २००६<br>७ डिसेंबर,२००६<br>७ डिसेंबर, २००६<br>८ डिसेंबर, २००६<br>८ डिसेंबर,२००६<br>११ डिसेंबर,२००६<br>११ डिसेंबर,२००६<br>१३ डिसेंबर, २००६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २८) | अठ्ठाविसावी समिती | श्री. संजय देवतळे | २००७ -०८ | तेरावा अहवाल (जालना जिल्हा)<br>चौदावा अहवाल (यवतमाळ जिल्हा)<br>पंधरावा अहवाल (रत्नागिरी जिल्हा)<br>सोळावा अहवाल (विशेष अहवाल)<br>सतरावा अहवाल (परभणी जिल्हा) | १ ऑगस्ट, २००७<br>२२ व २३ नोव्हेंबर, २००७<br>१ एप्रिल, २००८<br>२३ एप्रिल, २००८<br>२६ जुलै,२००८ |
| २९) | एकोणविसावी समिती | श्री. बंडूभाऊ सावरबांधे | २००८ -०९ | अठरावा अहवाल (नंदूरबार जिल्हा )<br>एकोणविसावा अहवाल (अहमदनगर जिल्हा)<br>विसावा अहवाल (कोल्हापूर जिल्हा) | २४ डिसेंबर, २००८<br>९ जून, २००९<br>११ जून,२००९ |
| | | **९) बारावी विधानसभा (अठ्ठावीस अहवाल)** | | | |
| ३०) | तिसावी समिती | श्री.विरेंद्र जगताप | २०१०-२०११ | पहिला अहवाल (नाशिक जिल्हा)<br>दुसरा अहवाल (उस्मानाबाद जिल्हा)<br>तिसरा अहवाल (बुलढाणा जिल्हा)<br>चौथा अहवाल (सिंधुदूर्ग जिल्हा)<br>पाचवा अहवाल (बीड जिल्हा)<br>सहावा अहवाल (सोलापूर जिल्हा)<br>सातवा अहवाल (धुळे जिल्हा)<br>आठवा अहवाल (रत्नागिरी जिल्हा)<br>नववा अहवाल (जळगाव जिल्हा)<br>दहावा अहवाल (गडचिरोली जिल्हा)<br>अकरावा अहवाल | २७ जुलै, २०१०<br>२७ जुलै, २०१०<br>२७ जुलै, २०१०<br>१४ डिसेंबर, २०१०<br>१४ डिसेंबर, २०१०<br>१४ डिसेंबर, २०१०<br>१४ डिसेंबर, २०१०<br>२० एप्रिल, २०११<br>२० एप्रिल, २०११<br>२० एप्रिल, २०११ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | (लातूर जिल्हा)<br>बारावा अहवाल<br>(पुणे जिल्हा)<br>तेरावा अहवाल<br>(चंद्रपूर जिल्हा)<br>चौदावा अहवाल<br>(नंदूरबार जिल्हा)<br>पंधरावा अहवाल<br>(अमरावती जिल्हा)<br>सोळावा अहवाल<br>(भंडारा जिल्हा) | १२ ऑगस्ट, २०११<br>१२ ऑगस्ट, २०११<br>१२ ऑगस्ट, २०११<br>२३ डिसेंबर, २०११<br>२० एप्रिल, २०१२<br>२० एप्रिल, २०१२ |
| ३१) | एकतीसावी समिती | श्री. सदाशिवराव पाटील | २०१२-२०१३ | सतरावा अहवाल<br>(जालना जिल्हा)<br>अठरावा अहवाल<br>(कोकण विभागीय)<br>एकोणिसावा अहवाल<br>(गोंदिया जिल्हा)<br>विसावा अहवाल<br>(वर्धा जिल्हा)<br>एकविसावा अहवाल<br>(अहमदनगर जिल्हा)<br>बाविसावा अहवाल<br>(नांदेड जिल्हा)<br>तेविसावा अहवाल<br>(सांगली जिल्हा)<br>चौविसावा अहवाल<br>(हिंगोली जिल्हा)<br>पंचविसावा अहवाल<br>(वाशिम जिल्हा)<br>सव्विसावा अहवाल<br>(अकोला जिल्हा)<br>सत्ताविसावा अहवाल<br>(यवतमाळ जिल्हा)<br>अठ्ठाविसावा अहवाल<br>(अमरावती जिल्हा) | १४ डिसेंबर, २०१२<br>१४ डिसेंबर, २०१२<br>१४ डिसेंबर, २०१२<br>१९ डिसेंबर, २०१२<br>१९ डिसेंबर, २०१२<br>१५ एप्रिल, २०१३<br>१५ एप्रिल, २०१३<br>१५ एप्रिल, २०१३<br>३० जुलै, २०१३<br>१ ऑगस्ट, २०१३<br>१२ डिसेंबर, २०१३<br>४ जून, २०१४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **१०) तेरावी विधानसभा (चार अहवाल)** | | | | | |
| ३२) | बत्तिसावी समिती | श्री. जयकुमार रावल | २०१५-२०१६ | पहिला अहवाल (ठाणे जिल्हा)<br>दुसरा अहवाल (सोलापूर जिल्हा)<br>तिसरा अहवाल (नाशिक जिल्हा)<br>चौथा अहवाल (उस्मानाबाद जिल्हा) | ३१ जुलै, २०१५<br>२२ डिसेंबर, २०१५<br>१५ डिसेंबर, २०१६<br>६ एप्रिल, २०१७ |
| ३३) | तेहत्तिसावी समिती | श्री. प्रशांत बंब | २०१७-२०१८ | ----- | ----- |
| **१०) चौदावी विधानसभा (एक अहवाल)** | | | | | |
| ३४) | चौतिसावी समिती | श्री.मनोहर चंद्रिकापूरे | २०२०-२०२१ | पहिला अनुपान अहवाल (उस्मानाबाद जिल्हा) | २३ मार्च, २०२२ |